# महात्मा गांधी आणि सामाजिक न्याय

**सुशांत माळवी,** संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात भारतात सामाजिक न्यायाचा विकास होत गेला. परिणामी या कालखंडाला आधुनिक भारतातील समाज प्रबोधनाचे युग समजले जाते. याच कालखंडामध्ये भारतात पाश्चात्य शिक्षणाच्या संपर्कामुळे अनेक नवशिक्षीतांच्या मनात नवविचारांचे आणि कल्पनांचे वारे वाहू लागले. स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जशी तरुणाची एक साखळी निर्माण झाली. तशीच याच काळात समाज सुधारकांचीही एक साखळी निर्माण झाली. या समाजसुधारकांनी समाजातील रूढी परंपराच्या विरोधात जाऊन समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये रानडे, गोखले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी इत्यादी राजकीय विचारवंतव नेते महत्त्वाचे आहेत. त्यात महात्मा गांधी यांनी सामाजिक न्यायाचा पुरस्कार करून सर्व लोकांना समान न्याय प्राप्त झाला पाहिजे असे विचार मांडले .

**उद्देश :** १.सामाजिक न्यायाचा अभ्यास करणे.

२.महात्मा गांधी यांच्या सामजिक न्यायचे विचार अभ्यासने.

**सामाजिक न्याय :** सामाजिक न्यायाचा सर्वसाधारण अर्थ आहे “समाजातील प्रत्येक व्यक्तीला जीवनाची मुलभूत व अनिवार्य गरज अन्न, वस्त्र, निवारा यांची उपलब्धता होऊन प्रत्येक व्यक्तीला विकासासाठी योग्य संधी मिळणे व एका व्यक्तीद्वारा दुसऱ्या व्यक्तीच्या होणाऱ्या शोषणास थांबविणे व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे होय,” (जोशी, (२००७) :४२७) यावरुन सामाजिक न्याय या संकल्पनेचे तीन मुख्य आधार असलेले दिसून येतात. स्वातंत्र, समानता आणि सुरक्षा, त्यांच्या मुळाशी असलेली सर्वात महत्वपुर्ण गोष्ट म्हणजे तणाव आणि भय यांच्यापासून मुक्ती मिळणे होय. राज्याचे कर्तव्य आहे की राज्यात शांतता, सुव्यवस्था निर्माण करणे व संघर्षाचे उन्मूलन करणे.

सामाजिक विषमता असणाऱ्या समाजात व्यक्तीचा सर्वांगीण विकास होत नाही. तसेच समाजात ऐक्य, सामंजस्य व समता प्रस्थापित होत नाही. समाजातील कनिष्ठ लोक जेव्हा सामाजिक न्यायाची मागणी करतात तेव्हा राज्याने विशेष सवलती व अधिकार देऊन न्याय दिला पाहिजे. भारतात फार मोठया प्रमाणात विषमता होती तेव्हा सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी व कनिष्ठ वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनाचे कार्य केले. तसेच महात्मा गांधींनींही अस्पृश्यता निवारणाचे महान कार्य केले आहे.

**महात्मा गांधी यांचे सामाजिक न्याया विषयक विचार :**

गांधीजींनी इतर विचारवंत आणि तत्त्ववेत्तांप्रमाणे औचित्याचा मुद्दा व्यक्त केला नाही. गांधीजींच्या लेखनात सामाजिक न्यायाचे तत्त्व किंवा संकल्पना मुक्तपणे चर्चिली जात नाही. तथापि औचित्य हा त्याच्या सर्व विचारांचा निकष आहे. गांधीजींनी भारतात सामाजिक न्याय चळवळीचा पाया घातला. गांधीजींपूर्वी अनेक कवी, संत आणि समाजसुधारकांनी जातीभेद आणि अस्पृश्यतेतून निर्माण होणाऱ्या सामाजिक अन्यायाचे प्रश्न मांडले होते. सामाजिक न्याय ही बहुआयामी संकल्पना आहे. हे विविध गांधीवादी विचारांमध्ये दिसून येते. जसे की सत्य आणि अहिंसेची संकल्पना, रामराज्य, स्वराज, सर्वोदय, सत्याग्रह आणि विश्वस्तपदाची संकल्पना. गांधीजींच्या या तत्त्वांच्या तात्विक संकल्पना न्याय्य सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेला आधार देतात. राज्यकारभाराचे गांधीजींचे विचार आणि शासनाचे विकेंद्रीकरण ही व्यक्तीस्वातंत्र्याची हमी आहे. २६ जुलै १९४२रोजी प्रकाशित झालेल्या हरिजन मासिकात गांधीजींनी लिहिले की,ग्रामस्वराज्याची माझी कल्पना अशी आहे की ते (गाव) पूर्णपणे लोकशाही असले पाहिजे, त्याच्या आवश्यक गरजांसाठी (स्वयंपूर्ण) आसपासच्या प्रदेशांवर किंवा गावांवर अवलंबून राहू नये. असे असूनही एकमेकांवर अत्यावश्यक अवलंबित्वाच्या बाबतीत एक इतर क्षेत्रांवर अवलंबून आहे.

पंचायती राज म्हणजे स्थानिक पातळीवर गोष्टी व्यवस्थापित करण्यासाठी कायदेशीर राजकीय प्रशासनात

लोकांना सहभागी करून घेण्याची व्यवस्था. शिवाय शहरांच्या राजकीय वर्चस्वातून आणि आर्थिक शोषणापासून गावांना मुक्त करण्यासाठी पंचायत राजची स्थापना करण्यात आली. गांधीजींचे पंचायत राज ग्रामीण समाजाच्या पूर्ण नैतिक विकासासाठी व्यक्ती आणि समुदायाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करते. गांधीजींनी मानवी समानतेवर भर दिला. राजकीय संस्था लोकांच्या आर्थिक कल्याणासाठीच संबंधित असतात हे त्यांना माहीत होते. गांधीजींच्या मते, माझ्या आर्थिक समानतेच्या संकल्पनेचा अर्थ असा नाही की प्रत्येक व्यक्तीला समान रक्कम मिळेल. खरं तर, माझ्या संकल्पनेचा अर्थ असा आहे की प्रत्येकाकडे त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे पैसे असले पाहिजेत. गांधीजींनी आर्थिक न्यायासाठी पाच पर्याय मांडले आहेत, जे पुढीलप्रमाणे आहेत.

१. संपत्ती आणि सत्तेचे विकेंद्रीकरण
२. कुटीर उद्योग आणि लघुउद्योग
३. उपभोक्तावादाला विरोध
४. समान वितरण
५.विश्वस्तप

अलीकडच्या काळात प्रचलित असलेली क्रूर असमानता अहिंसेने दूर केली पाहिजे, असाही त्याचा अर्थ होता, असे गांधींनी निदर्शनास आणून दिले.

गरीब आणि शोषितांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी गांधीजींचे संपूर्ण आयुष्य गेले. कृष्णवर्णीय नागरिकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी दक्षिण आफ्रिकेत सुरू झालेल्या लढ्याला भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी होती. दक्षिण आफ्रिकेतून परतल्यानंतर गांधीजींना दोन आव्हानांना सामोरे जावे लागले. एकीकडे परकीय राज्यकर्त्यांच्या तावडीतून देशाची सुटका करणं आणि दुसरीकडे भारतीय समाजात फोफावलेल्या अंतर्गत कुरबुरी दूर करणं. भारताला ब्रिटिश राजवटीला सामोरे जावे लागले तर विद्यमान भेदभावपूर्ण समाज बदलणे आणि परस्पर संबंध सुधारणे आवश्यक होते. शतकानुशतके चालत आलेल्या अन्यायकारक प्रथा बदलणे किंवा नष्ट करणे हे सोपे काम नव्हते. लोकांना त्याग आणि त्यागासाठी प्रेरित करण्याची गांधीजींची अद्भुत क्षमता आणि मागासवर्गीयांबद्दलचे त्यांचे प्रेम यामुळे हे कठीण काम झाले. त्यांचा स्वातंत्र्याचा लढा ब्रिटिश सरकारविरुद्ध होता. त्याचबरोबर समतावादी समाजाच्या स्थापनेसाठी होता. या उद्देशाने गांधीजींनी समाजाच्या उन्नतीसाठी काही विधायक कार्यक्रम सुरू केले.जातीय एकता, अस्पृश्यता, दारूबंदी, खादी संवर्धन, ग्रामोद्योग, स्वच्छता शिक्षण, मूलभूत शिक्षण, हिंदी संवर्धन इतर भारतीय भाषांचा विकास, महिलांची प्रगती, आरोग्य, शिक्षण, प्रौढ शिक्षण, आर्थिक समता, शेतकरी देशाच्या हितासाठी.संघटन कामगार संघटना विद्यार्थी संघटना आणि स्वातंत्र्य व स्वराज्यासाठी अखंड संघर्ष. स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारतात सर्वांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे – हे गांधीजींचे स्वप्न होते. अशा प्रकारे पाहिले तर गांधीजींचे तत्वज्ञान आणि सामाजिक न्याय यात काहीच फरक नाही.

**सारांश :** आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सामाजिक न्यायाचा विकास झाला. महात्मा गांधी यांनी असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ आणि चलेजाव चळवळीने ब्रिटिश सत्ता हादरून गेली. हे करत असताना भारतात नवीन आधुनिक मुल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. भारतीय प्रबोधनाला गती मिळाली. धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात प्रगतीचे वारे वाहू लागले, इ.स १९२० नंतर गांधी यांनी स्वातंत्र्य चळवळ अहिंसा या तत्वाने लढवण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी सत्याग्रह, सविनय कायदेभंग, पदयात्रा या मार्गांचा स्वीकार करताना याला सामाजिक न्यायाचा किनार दिला. त्यांनी विचार व कृतीतून समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना त्यांनी सन्मान देण्याचे कार्य केल.

संदर्भ :

1.पवार प्रकाश, “भारतीय राज्यसंस्था आणि सामाजिक न्याय”, डायमंड पब्लिकेशन,२०२०
2.भाऊ धर्माधिकारी , “गांधी विचार दर्शन”, गांधी वाड्मय प्रकाशन समिती,१९६३
3.बाळासाहेब भारत , ‘गांधी विचार दर्शन ‘, महाराष्ट्र गांधी स्मारक, गांधी भवन , पुणे ,१९९४
4.पाटील विश्वास , ‘महानायक’,राजहंस प्रकाशन , पुणे,१९९८
5.वराडकर र.घ., “भारतातील राजकीय विचारवंत ”, विद्याभारती प्रकाशन, नागपूर